SMC-11012/30/2023-SMC-GAD

I/308963/2024

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.
दूरध्वनी ०२१७- ०२७४०३००
( आयुक्त कार्यालय, Email :-smccommissioner@yahoo.com)

---

**जा.क्र.नआ/वै/०४ पोस्ट/निवड यादी/ ५५०** दि.१२/03/2024 E- 232452

---

**संदर्भ:-** १. जा.क्र.नआ/वै/सरळसेवा पदभरती जाहीरात/३४०, दि. ०९/११/२०२३
२. जा.क्र.नआ/वै/सरळसेवा पदभरती जाहीरात/३८५, दि. १५/१२/२०२३
३. जा.क्र.नआ/वै/०४ पोस्ट/अं.गुण प्रसिध्दी/५३९ दि. १२/०३/२०२४ चे प्रसिध्दीपत्रक

## -: प्रसिध्दीपत्रक :-

सोलापूर महानगरपालिकेकडून उपरोक्त संदर्भ क्र.१ व २ ने जाहीरात प्रसिध्द करून वर्ग-अ (अराजपत्रित) ते वर्ग-ड मधील आस्थापनेवरील ३१ विविध संवर्गामधून एकुण ३०२ पदे भरण्याबाबतची पदभरती जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. उपरोक्त पदभरती जाहीरातीमध्ये नमूद पदाच्या ऑनलाईन परीक्षा दि.१५/०२/२०२४ ते दि.१७/०२/२०२४ या कालावधीत TCS iON यांच्याकडून घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत प्राप्त गुणानुक्रमानुसार सामाजिक व समातंर आरक्षण तसेच समान गुण मिळालेल्या उमेदवारांची प्राधान्यवारी क्रमवारी विचारात घेऊन उपरोक्त ३१ संवर्गापैकी गट क मधील आरोग्य निरिक्षक, केमिस्ट, अनुरेखक (ट्रेसर), फिल्टर इन्स्पेक्टर, या चार संवर्गाची निवडसूची सोलापूर महानगरपालिकेचे www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर निवड यादी संदर्भ क्र.३ ने प्रसिध्द करण्यात आली असून उमेदवाराची अंतिम निवडी करीता दस्तऐवज पडताळणी, वैद्यकिय तपासणी व पूर्व चारित्र्य पडताळणीचे अधीन राहून शिफारस करण्यात आली आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या खाली नमूद संवर्गातील निवड यादीत नमूद उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात अपलोड केलेले दस्तऐवज जसे की, शैक्षणिक अर्हता, अनुभव, जात प्रमाणपत्र/वैधताप्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र व इतर सर्व दस्ताऐवज यांची मूळ कागदपत्रे व त्याच्या प्रत्येकी दोन स्वसाक्षांकित प्रतिसह स्वत: (प्रतिनिधी/पाहुणे/भाऊ चालणार नाही) दस्तऐवज पडताळणीकरीता खाली नमूद ठिकाणी व वेळी उपस्थित राहावे.

| अ.क्र. | संवार्गचे नांव | विभाग प्रमुख | दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | आरोग्य निरिक्षक | घन कचरा व्यवस्थापन विभाग | दिनांक - १३/०३/२०२४ ते १४/०३/२०२४ अखेर<br>वेळ :- सकाळी ११.०० ते सायंकाळी. ०५.०० या वेळेत<br>**(कार्यालयीन दिवशी व वेळेत)** |
| २ | केमिस्ट | सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय | |
| ३ | फिल्टर इन्स्पेक्टर | सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय | |
| ४ | अनुरेखक (ट्रेसर) | नगररचना विभाग | |

दस्ताऐवज पडताळणीचे वेळी उमेदवाराने स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी अर्जासोबत जोडलेला ओळखीचा पुरावा, स्वत:चे आधारकार्ड व त्याची स्वसाक्षांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे. उमेदवाराने आरक्षित जागेकरीता अर्ज केला असल्यास त्या पुष्टार्थ आवश्यक असलेली मूळ प्रमाणपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

तसेच अर्जासोबत सादर केलेली माहिती व अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रांच्या अनुषंगाने उमेदवाराने सोबत आणावयाची मूळ कादपत्रे खालीलप्रमाणे.

I/308963/2024

| अ.क्र. | कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागू असल्याप्रमाणे) |
|---|---|
| १ | एस.एस.सी. प्रमाणपत्र |
| २ | पदास आवश्यक असलेले शैक्षणिक अर्हतेची पूर्तता करीत असलेबाबत तसेच आवश्यक अर्हतेपेक्षा जास्त शैक्षणिक अर्हता असल्यास त्याबाबत गुणपत्रिका व प्रमाणपत्रे |
| ३ | वयाचे पुराव्याबाबत जाहिरातीमध्ये नमूद पुरावा दर्शविणारे प्रमाणपत्र |
| ४ | उमेदवार मागास प्रवर्गातील असल्यास संबंधित जात प्रमाणपत्र (असल्यास जात वैधताप्रमाणपत्र) |
| ५ | अनुसूचित जमाती प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराचे जात वैधताप्रमाणपत्र |
| ६ | वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र |
| ८ | पात्र माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र |
| ९ | खेळाडू आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र |
| १० | अनाथ आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र |
| ११ | पदवीधर अंशकालीन आरक्षणाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र |
| १२ | भुकंपग्रस्त आरक्षाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र |
| १३ | प्रकल्पग्रस्त आरक्षाकरीता पात्र असल्याचे प्रमाणपत्र |
| १४ | उमेदवाराचे नावात बदल असल्यास विवाह नोंदणी दाखला अथवा राजपत्र इत्यादी |
| १५ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबत महाराष्ट्रातील जन्म दाखला/डोमिसाईल प्रमाणपत्र |
| १६ | पदाकरीता अनुभव आवश्यक असल्यास अथवा प्राधन्य असल्यास अशा पदाकरीता उमेदवाराने अनुभव नमूद केला असल्यास<br>१. नियुक्ती प्राधिकाराने दिलेला नियुक्ती आदेश.<br>२. नियुक्ती प्राधिकाराने दिलेले अनुभव प्रमाणपत्र<br>३. अनुभव कालावधीतील सर्व वेतन प्रत्रिका, ज्यात उमेदवाराचा आय.डी. क्रमांक व बँकचे नाव नमूद असेल.<br>४. अनुभव कालावधीतील उमेदवाराचे वेतन जमा झाल्याचे नोंद असलेले बँक पासबुक अथवा बँक स्टेटमेंट |
| १७ | या व्यतिरिक्त सक्षम प्राधिकाऱ्यांने मागणी केलेला कुठलाही आवश्यक दस्तऐवज |

उमेदवार विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा दस्तऐवज पडताळणीकरीता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास उमेदवारास निवडीसाठी अपात्र करण्यात येईल व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

उपरोक्त नमूद दिवशी दस्तऐवज पडताळणीकरीता उपस्थित न राहिल्यास उमेदवारास नियुक्तीची आवश्यकता नाही असे गृहित धरून निवड रद्द केली जाईल व तदनंतर या संदर्भात होणाऱ्या कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

दस्तऐवज पडताणीकरीता उमेदवाराने स्व: खर्चाने उपस्थित रहावायाचे आहे. दस्तऐवज प्रक्रियेबाबत मा.आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांचा निर्णय अंतिम राहिल व तो उमेदवारावर बंधनकारक राहील.

Signed by
Sheetal Basavaraj Teli Ugale
Date: 12-03-2024 19:22:50
(शीतल तेली-उगले भा.प्र.से.)
**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका**